# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
# Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी - २२८२१७२८, २२८२११६७
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३११५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


## उच्च श्रेणी लघुलेखक (इंग्रजी) गट - ब (अराजपत्रित) सामान्य प्रशासन विभाग.

**धारिका क्रमांक :११(०४)/९९४-A/पंधरा** **जाहिरात क्रमांक : ५२/२०१५**

आयोगामार्फत महाराष्ट्र राज्य शासनाचे (**सामान्य प्रशासन विभागा अंतर्गत) विविध मंत्रालयीन विभाग व बृहन्मुंबईतील विविध कार्यालयातील उच्च श्रेणी लघुलेखक (इंग्रजी), गट - ब (अराजपत्रित)** या पदाच्या **२५** जागांसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदासाठी अर्हताप्राप्त असलेले उमेदवार अर्ज करु शकतात.

**२. मंत्रालयीन प्रशासकीय विभागातील लघुलेखक (उच्च श्रेणी) (इंग्रजी) करिता उपलब्ध पदे - १८**

| एकूण पदसंख्या | | आरक्षण | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | उन्नत व प्रगत गटात न मोडणारे | | |
| | | अमागास | अनुसूचित जाती | वि.जा.(अ) | भ.ज.(क) | इमाव |
| १५+३▼ = १८ (▼ अनुशेषाची पदे) | सर्वसाधारण | ७ | १▼ | १ | १▼ | १ + १▼ |
| | महिला * | ३ | १ | -- | -- | १ |
| | खेळाडू ☑ | १ | -- | -- | -- | -- |
| | एकूण | ११ | १ + १▼ | १ | १▼ | २ + १▼ |
| | @ विकलांग १ पद - चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू (Locomotor Disability or cerebral palsy) या प्रवर्गातून भरण्यात येईल. **@ विकलांग वर्गवारीसाठी आरक्षित असलेले पद एकूण भरावयाच्या पदसंख्येपैकी आहे.** उपलब्ध असल्यास * महिला आणि ☑ खेळाडू साठी आरक्षित. | | | | | |

**३. बृहन्मुंबईतील शासकीय कार्यालयातील लघुलेखक (उच्च श्रेणी) (इंग्रजी) - करिता उपलब्ध पदे ७**

| एकूण पदसंख्या | | आरक्षण | |
|---|---|---|---|
| | | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती |
| ०७▼ (▼ अनुशेषाची पदे) | सर्वसाधारण | ३▼ | २▼ |
| | महिला * | १▼ | १▼ |
| | एकूण | ४▼ | ३▼ |
| | @ विकलांग १ पद -- चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू (Locomotor Disability or cerebral palsy ) या प्रवर्गातून भरण्यात येईल. **@ विकलांग वर्गवारीसाठी आरक्षित असलेले पद एकूण भरावयाच्या पदसंख्येपैकी आहे.** उपलब्ध असल्यास * महिला साठी आरक्षित. | | |

४. वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**४.१** शासन आदेशानुसार वि.जा. (अ) ,भ.ज. (क) या प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या पदावर योग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पद अंतर्गत परिवर्तनीयतेने भ.ज. (ब), भ.ज. (ड) या प्रवर्गातून गुणवत्तेनुसार भरण्यात येईल.

**टीप - मंत्रालयीन प्रशासकीय विभागातील व बृहन्मुंबई शासकीय कार्यालयातील सर्व पदांसाठी एकत्रित शिफारस यादीद्वारे शासनास उमेदवारांच्या शिफारशी करण्यात येतील.**

५. सामान्य प्रशासन विभाग क्र.एएससी १४११/ प्रक्र ७/११/१४-अ मंत्रालय , मुंबई ३२ दिनांक १३ जानेवारी २०११च्या शासननिर्णयानुसार (१) अंध / क्षीणदृष्टी (blindness / low vision) (२) चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू (locomotor disability or cerebral palsy) प्रवर्गाचे विकलांग असलेले उमेदवार प्रस्तुत पदासाठी अर्ज करण्यासाठी पात्र आहेत.

**६. वेतनश्रेणी : पे बॅण्ड रु. ९३००-३४८००, ग्रेड पे ४४००/- अधिक इतर भत्ते -**

**७. पात्रता-**

**७.१ वय दिनांक १ सप्टेंबर, २०१५** रोजी अमागास वर्गवारी करीता १८ वर्षापेक्षा कमी व ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे. व मागासवर्गीयांसाठी ३८ वर्षापेक्षा जास्त नसावे.

**७.२** महाराष्ट्र शासन सेवेत नियमित नियुक्ती झालेल्या कर्मचा-यांना उच्च वयोमर्यादा पाच वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.

**७.३** जे उमेदवार अगोदरच शासन सेवेत आहेत आणि ज्यांची नियुक्ती यथोचितरित्या नियमित झालेली आहे अशा अमागासवर्गीय, मागासवर्गीय आणि खेळाडू उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा ३८ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहिल. तथापि वयोमर्यादेतील शिथीलतेची सवलत कोणतीही एकच देय राहील.

**७.४** शासन आदेशानुसार संबंधित आरक्षित प्रवर्ग/उपप्रवर्गासाठी वयोमर्यादा शिथिलम राहील.

**८. अर्हता :-** **१.** माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण.

**२.** इंग्रजी लघुलेखनाची गती १२० शब्द प्रती मिनीट व इंग्रजी टंकलेखनाची गती ४० शब्द प्रती मिनीट (तत्संबंधी शासकीय परीक्षा मंडळाचे प्रमाणपत्र आवश्यक)

**३.** संगणक हाताळणी/वापराबाबतचे ज्ञान आवश्यक. (महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांची MS-CIT परिक्षा किंवा D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत "C.C.C." किंवा "O" किंवा "A" किंवा "B" किंवा "C" स्तर परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक.)

**९.** उच्चश्रेणी लघुलेखक (इंग्रजी) गट - ब (अराजपत्रित) पदावर नियुक्ती होणा-या उमेदवारांना महाराष्ट्र नागरी सेवा (इंग्रजी लघुलेखक व इंग्रजी टंकलेखक यांना प्राप्त करावयाच्या मराठी लघुलेखन/मराठी टंकलेखन परिक्षा सक्तीची करण्याबाबत नियमावली) नियम १९९१ मधील नियम ३ व ४ नुसार, एतदर्थ मंडळाची मराठी ८० शब्द प्रति मिनीट गतीची मराठी लघुलेखनाची व ३० शब्द प्रति मिनीट गतीची मराठी टंकलेखनाची परीक्षा शासन सेवेत प्रविष्ठ झाल्याच्या दिनांकापासून ज्यांनी प्रथम भाषा मराठी (उच्च स्तर) विषय घेऊन माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेल्या इंग्रजी लघुलेखकांनी चार वर्षाच्या आत व प्रथम भाषा म्हणून मराठी (उच्च स्तर) विषय न घेता माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेल्या इंग्रजी लघुलेखकांनी सहा वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

**१०.** प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी अर्हता किमान असून किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरीता पात्र असणार नाही. जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोईस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टिने जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभव यापेक्षा जादा शैक्षणिक अर्हता/अनुभव याच्या आधारे किंवा अन्य योग्य निकष निश्चित करुन अथवा चाळणी परीक्षेद्वारे मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल. चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास, अर्हता आणि / अथवा अनुभव शिथील केला जाणार नाही. चाळणी परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येईल. प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पद्धत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क,निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील सरळसेवा भरती अंतर्गत "उमेदवारांना सर्वसाधारण सूचना" मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

मुलाखतीसाठी बोलावलेल्या उमेदवारांची मुलाखतीपूर्वी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यालयात लघुलेखनाची प्रत्यक्ष चाचणी घेण्यात येईल.

मुलाखतीपूर्वी घेण्यात येणा-या लघुलेखनाच्या चाचणीचे व मुलाखतीचे गुण एकत्रित करुन अंतिम निकाल जाहीर करण्यात येईल. (मात्र सदर पदासाठी घेण्यात येणा-या चाळणी परीक्षेचे गुण अंतिम निकालासाठी विचारात घेण्यात येणार नाहीत.)

**११. जे उमेदवार चुकीची माहिती सादर करतील त्यांना या व पुढील सर्व निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.**

**१२.** कर्तव्ये व जबाबदा-या:- प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदा-या याबाबतचा तपशील आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

**१३. शुल्क :**

**१३.१ अमागास - रु. ३६५ /-, मागासवर्गीय - रु. २६५/-**

**१३.२ मागासवर्गीय उमेदवारांनी वयोमर्यादा, परीक्षा शुल्क व पात्रतेच्या निकषांमध्ये सवलत किंवा सूट याचा फायदा घेतला असल्यास अशा उमेदवारांची सर्वसाधारण (अमागास) वर्गवारीच्या पदावर शिफारस करण्यात येणार नाही.**

**१४. अर्ज करण्याची पध्दत –**

**१४.१** प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

**१४.२**पात्र उमेदवारांना वेब-बेस्ड (Web-based) ऑन लाईन अर्ज www.mahampsc.mahaonline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक १९ मे, २०१५ ते दिनांक ८ जून, २०१५** या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

**१४.३** ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या www.mahampsc.mahaonline.gov.in तसेच www.mpsc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**१४.४** विहित पद्धतीने आयोगास अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

**१४.५** आयोगाने निश्चित केलेला परीक्षा शुल्क खालील पद्धतीने भरता येईल :-

(१) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाव्दारे (२) नेटबँकिंग (३) डेबीट कार्ड (४)क्रेडिट कार्ड (५) संग्राम केंद्र/ सीएससी (नागरीक सेवा केंद्र)

**१४.६** www.mahampsc.mahaonline.gov.in येथे संग्राम केंद्र (ग्रामपंचायतींमध्ये) आणि सीएससी ची सूची उपलब्ध आहे.

**१४.७** परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पद्धतींचा अवलंब करावा :-

(१) शुल्क भरण्याकरिता मुख्य पृष्ठाच्या डाव्या भागावरील " माझे खाते " या लिंक वर क्लिक करावे.

(२) " माझे खाते " या लिंक वर क्लिक केल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क भरल्याच्या / न भरल्याच्या नोंदीसह सेल. ज्या पदासमोर **' Unpaid '** असे लिहिलेले असेल, त्या ठिकाणी **'Pay Now'** अशी लिंक उपलब्ध असेल.

(३) **"Pay Now"** या लिंक वर क्लिक केल्यानंतर 3 पर्याय उपलब्ध होतील. (१) ऑनलाईन पेमेंट (२) नागरी सुविधा केंद्र (३)चलानद्वारे

(४) उमेदवार क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन पेमेंट करु शकतील.

(५) नागरी सुविधा केंद्र हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा केंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुल्काचा भरणा केला जाऊ शकतो. उपरोक्त कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

**(६)** उमेदवाराने चलनाद्वारे हा पर्याय निवडल्यास, उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुक्लाचा भरणा केला जाऊ शकतो.

**(७)** ज्या उमेदवारांना भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरावयाचे आहे असे उमेदवार अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणा-या उमेदवारांनी त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

**१५.** चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास चाळणी परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेश प्रमाणपत्र त्याच्या प्रोफाईलव्दारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमदेवाराने चाळणी परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व चाळणी परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**१६.** चाळणी परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेश प्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय चाळणी परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**१७.** आयोगाच्या कार्यालयात, परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात तसेच मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधन आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.

**१८.** खेळाडू वर्गवारीसाठी दावा करणा-या उमेदवारांनी त्यांची खेळाडूबाबतची प्रमाणपत्रे संचालक, क्रिडा व युवक संचालनालयाकडून अर्ज करण्यापूर्वीच प्रमाणित करुन घेण्यात यावीत.

**१९. उमेदवाराने मुलाखतीच्यावेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे. सदर मूळ प्रमाणपत्रे मुलाखतीचे वेळी सादर न केल्यास अथवा ती योग्य नसल्यास मुलाखत घेण्याचे नाकारले जाईल, याची कृपया नोंद घ्यावी.**

**२०.विहित पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्याची, तसेच स्टेट बँकेमध्ये परीक्षा शुल्क भरण्याकरिता चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दिनांक ८ जून, २०१५ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.**

**२१. चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक ९ जून, २०१५ पर्यंत बॅकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर परीक्षा शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच परीक्षा शुल्काचा परतावाही केला जाणार नाही..**

**ठिकाण :- मुंबई** — **राजन बा. खोत**

**दिनांक :- १९ मे, २०१५** — **उपसचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग**